RNI No. MAHBIL/2009/35827

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## भाग दोन-संकीर्ण सूचना व जाहिराती

वर्ष ८ अंक १] गुरुवार ते बुधवार, जानेवारी ६-१२, २०२२/पौष १६-२२, शके १९४३ [पृष्ठे ६, किंमत : रुपये १५.००

## प्राधिकृत प्रकाशन

## संकीर्ण सूचना व जाहिराती

### ठाणे महानगरपालिका, ठाणे

क्रमांक ठामपा/अति.वि./आयुक्त/८६६/२०२१

### अधिसूचना

ज्याअर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २६० आणि कलमे २६१, २६४, २६७ व ४७८ यांचे प्रयोजनाकरिता आयुक्त यांनी **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे पदनिर्देशित अधिकारी म्हणून महानगरपालिकेच्या एखाद्या अधिकाऱ्यास पदनिर्देशित करावयाचे आहे.

ज्याअर्थी, पदनिर्देशित अधिकाऱ्यांची अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा स्थानिक क्षेत्रावर अधिकारिता असेल आणि वेगवेगळ्या स्थानिक क्षेत्राकरिता वेगवेगळे अधिकारी पदनिर्देशित करावयाचे आहेत.

ज्याअर्थी, उपरोक्त तरतुदीनुसार अधिसूचना क्रमांक ठामपा/अति.वि./आयुक्त/९१४/२०१७, दिनांक २४ नोव्हेंबर २०१७ अन्वये दिवा प्रभाग समिती वगळता इतर प्रभाग समिती क्षेत्राकरिता संबंधित प्रभाग समिती सहायक आयुक्त यांची व दिवा प्रभाग समिती क्षेत्राकरिता कार्यालयीने अधीक्षक यांची " पदनिर्देशित अधिकारी " म्हणून नियुक्ती करण्यात आली होती.

ज्याअर्थी, दिवा प्रभाग समिती क्षेत्रासाठी सहायक आयुक्त यांची नेमणूक करण्यात आलेली आहे.

त्याअर्थी, मी, डॉ. विपीन शर्मा, महापालिका आयुक्त, ठाणे महानगरपालिका, खाली नमूद केलेल्या अधिकाऱ्याची त्यांचे पदनामासमोर दर्शविलेल्या क्षेत्राकरिता " पदनिर्देशित अधिकारी " म्हणून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील उक्त कलमांच्या प्रयोजनाकरिता नियुक्ती करीत आहे.

| अ.क्र. | पदनिर्देशित अधिकारी | स्थानिक क्षेत्र |
|---|---|---|
| १ | सहायक आयुक्त, दिवा प्रभाग समिती | दिवा प्रभाग समिती (प्रभाग क्र. २७, २८, २९, ३३) |

**डॉ. विपिन शर्मा** (भा.प्र.से.),
महापालिका आयुक्त,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

ठाणे,
दिनांक २९ डिसेंबर २०२१.

महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

# महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

## प्रस्तावित योजनांची अधिसूचना

No. MSETCL/CO/PS/Scheme-I/RE-ORC/PN/7885

विद्युत कायदा, २००३ च्या कलम १६४ प्रमाणे व महाराष्ट्र शासनाच्या आदेश क्रमांक ०६/प्र.क्र.३१२/ऊर्जा/४, दिनांक २४ ऑगस्ट २००६ (**शासकीय राजपत्र,** पान क्रमांक २८०) नुसार, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीस प्रदान केलेल्या अधिकारानुसार, खाली नमूद केल्याप्रमाणे अति उच्च दाब पारेषण योजनेचे डेडीकेटेड डिस्ट्रीब्युशन फॅसिलिटी अंतर्गत महापारेषणच्या देखीरेखीखाली काम हाती घेण्याचे प्रस्तावित करीत आहे. या सर्व अधिकारांचा वापर प्रस्तावित योजनेतील विजेचे पारेषण, वितरण अगर म.रा.वि. पारेषण कं. मर्या. च्या समन्वय, संचलन व सुव्यवस्था या कामाकरिता पारेषण कंपनीद्वारे करण्यात येईल. जनतेच्या माहितीकरिता ही अधिसूचना देण्यात येत आहे.

२. खालील योजना त्या भागातील अति उच्च दाब ग्राहकांच्या वाढत्या विजेची गरज पुरविण्यासाठी व नविन ग्राहकांना वीज पुरवठा करण्यासाठी, तसेच विद्युत पुरवठा तसेच विद्युत प्रणाली सक्षम करण्यासाठी आहे.

(अ) पुणे जिल्ह्यातील एम.आय.डी.सी. चाकण फेज–II, वासुली गाव, ता. खेड येथील मे. टेट्रा पॅक इंडिया प्रा. लि. यांना २२० के.व्ही. क्षमतेवर १० मे. वॅ. विद्युत पुरवठा करणेबाबत. मे. टेट्रा पॅक इंडिया प्रा. लि. यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादितच्या देखरेखीखाली करावयाची कामे. (१) गॅंट्री पायाभरणी, उपकरणे पायाभरणी, कंट्रोल रुम, मिटरिंग रुम, केबल ट्रेंच, मेटल स्प्रेडींग व जी.आय.पाईप इ. सहित २२० के.व्ही. उपकेंद्राची उभारणी मे. टेट्रा पॅक इंडिया प्रा.लि. यांच्या जागेत करणे. (*i*) मे. टेट्रा पॅक इंडिया प्रा.लि. च्या जागेत २२० के.व्ही. वाहिनी बे उभारणे-२ नं. (*ii*) मे. टेट्रा पॅक इंडिया प्रा.लि. च्या जागेत मीटरींग सीटी, पीटी (मेन व चेक), आयसोलेटर उभारणे-१ नं. (एम.ई.आर.सी. मिटरींग कोड २०१९ अन्वये मेन व चेक मीटर सहित) (*iii*) २२० व्होल्ट व ४८ व्होल्ट बॅटरी व बॅटरी चार्जर (*iv*) एफ. ओ. टी. उपकरणे-३ नं. (*v*) मे. टेट्रा पॅक इंडिया प्रा.लि. उपकेंद्रात बस बार प्रोटेक्शन उभारणे (*vi*) २२० के.व्ही. पीटी बे-१ नं. (२) २२० के.व्ही. ब्रीजस्टोन – चाकण फेज-II वाहिनीवर मे. टेट्रा पॅक इंडिया प्रा.लि. उपकेंद्रापर्यंत लिलो वाहिनी उभारणे-१०० मीटर्स (३) २२० के.व्ही. ब्रीजस्टोन - चाकण फेज-II वाहिनीवर अस्तित्वात असलेली २४ फायबर ओ.पी.जी. डब्ल्यू. वाहिनी बदलून ४८ फायबर ओ.पी.जी. डब्ल्यू. वाहिनी उभारणे-५ कि.मी. (४) २२० के.व्ही. ब्रीजस्टोन – चाकण फेज-II वाहिनीच्या लिलो पॉईंटपासून मे. टेट्रा पॅक इंडिया प्रा. लि. च्या उपकेंद्रापर्यंत ओ.पी.जी. डब्ल्यू. वाहिनी उभारणे-१०० मीटर्स (५) एबीटी मोजणी व इतर संलग्न उपकरणे उभारणे. (६) स्काडा प्रणाली उभारणे. या योजनेचा अंदाजे खर्च रु. ७२०.५८ लाख इतका आहे.

३. परवानेधारक अगर हितसंबंध असलेल्या व्यक्तीने हवे असल्यास, ही सूचना प्रसिद्ध केलेल्या तारखेपासून दोन महिन्यांच्या आत महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादितच्या विचाराकरिता पारेषण कंपनीस प्रतिवेदने पाठवावीत, अशी त्यांना अधिसूचना देण्यात येत आहे. याबाबतची अधिक माहिती अधीक्षक अभियंता (योजना-I), महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित, ३ रा मजला, प्रकाशगंगा, प्लॉट नं. सी-१९, बांद्रा-कुर्ला संकुल, बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१ यांचेशी वेळीच संपर्क साधून मिळू शकते.

मुंबई,
दिनांक २८ डिसेंबर २०२१.

**नसीर कादरी,**
संचालक (प्रकल्प).

## जिल्हा परिषद, जळगाव

क्रमांक साप्रवि/वाप्रअ/आरआर/६५६/२०२१

## जाहिरनामा

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (वार्षिक प्रशासन अहवाल) नियम, १९६४ मधील नियम ९ अन्वये, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव जाहीर करतात की, जळगाव जिल्हा परिषदेचा सन २०२०-२०२१ चा वार्षिक प्रशासन अहवाल जिल्हा परिषद, ठराव क्र. ६४०, दिनांक १४ ऑक्टोबर २०२१ रोजी मंजूर केला आहे.

**डॉ. पंकज आशिया** (भा.प्र.से.),
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, जळगाव.

## जिल्हा परिषद, धुळे

क्रमांक साप्रवि/आस्था १-ब/५८६/२०२१

## अधिसूचना

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम १४२, पोट-कलम (४) व महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती (वार्षिक प्रशासन अहवाल प्रसिद्ध करणे) नियम, १९६४ मधील नियम (६) अन्वये मी, वान्मथी सी. (भा.प्र.से.), मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे याद्वारे जाहीर करते की, धुळे जिल्हा परिषदेचा सन २०२०-२०२१ या वित्तीय वर्षाचा प्रशासन अहवालांस धुळे जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेतील ठराव क्रमांक २१३, दिनांक १३ डिसेंबर २०२१ अन्वये मंजुरी दिली असून वरील नियमातील नियम (९) अन्वये सदरच्या अहवालास स्विकृती संबंधी ही अधिसूचना प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**वान्मथी सी.** (भा.प्र.से.),
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, धुळे.

धुळे,
दिनांक २२ डिसेंबर २०२१.

## जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग

क्रमांक साप्रवि/नोंदणी/वाप्रअ कामकाज/२४०४/२०२१

## अधिसूचना

सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेचा व तिच्या कार्यक्षेत्रातील पंचायत समित्यांचा सन २०२०-२१ चा एकत्रित वार्षिक प्रशासन अहवाल, महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ चे कलम १४२ चे आधारे व महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, वार्षिक प्रशासन अहवाल नियम १९६४ व त्यामध्ये वेळोवेळी झालेल्या सुधारणानुसार तयार करणेत आला असून, सदर अहवाल जिल्हा परिषद, सिंधुदुर्गचे सर्वसाधारण सभेत ठराव क्रमांक ७५९, दिनांक २३ सप्टेंबर २०२१ ने संमत करून तो दिनांक २५ डिसेंबर २०२१ रोजी प्रसिद्ध केला आहे.

**प्रजित प्र. नायर** (भा.प्र.से.),
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग.

सिंधुदुर्ग,
दिनांक २५ डिसेंबर २०२१.

**BEFORE MOTOR ACCIDENT CLAIMS TRIBUNAL (AUXI), SURAT**

Room No. 413, New Court Building, Athwalins, Surat

MACP :126/2015

Applicant : Manishaben Kanjibhai Ghevariya — Adv—R.V. Navdiya
Add-76, Sarvoday nagar Udhana, Surat and
Flat No. 101, A-9, Shantivihar Meera Road,
East (Thane) Maharashtra.

*V/s*

Opponent : (1) Sumit Hariram Jadhav
Add-Sainath Chowk, Gavanpada, Chembur, Mumbai.

(3) Kavita Prabhakar Patil
Add-Fanas Pada, Vetarana, Po-Dahisar, Ta-Vasai, Dist. Thane, Maharashtra.

You, the Opponent No. 1 and 3 are hereby informed by this Public notice that the Scorpio Car No. MH-04-ED-8434 was your ownership, face an accident on 1st March 2015 Near Alipor Gam, Opposite Rajwadi Kathiyawadi Hotel, Surat. Hence, above applicants have file above petitions to get compensation under section 166 of M.V. Act.

You, the Opponent No. 1, 3 inspite of repeated process of notice by Court and by R.P.A.D. are not served, hence by this notice you are informed that you the Opponent No. 1, 3 must remain present before the Motor Accident Claim Tribunal (Auxi), Surat on 10th February 2022 at 10.30 a.m. personally or through Advocate under your instructions, failing which the same will be treated as your absence and the said application for Compensation shall be proceed *ex-party* and disposed off accordingly which, please note.

Signed and sealed today on this 27th December 2021 under my hand and seal of the court.

| Prepared by | Compared by | By Order |
|---|---|---|
| H.G. CHANDEL, | H. K. MEGHAT, | S.R. PATEL, |
| (Assistant) | (Superintendent) | (Deputy Registrar) |
| M.A.C.T. (Auxi), Surat. | M.A.C.T. (Auxi), Surat. | M.A.C.T. (Auxi), Surat. |

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.